# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २६७ - २३ दिनांक : - १९/०८/२०२३

## युंगाडा देशातील तिन महीलांची अवैध्य वेश्याव्यवसायातुन सुटका, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष - नालासोपारा यांची कारवाई

नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीतील सिल्वर प्लाझा बिल्डीग, हनुमान नगर,नालासोपारा पश्चिम, ता-वसई जि. पालघर याठीकाणी एक महीला वेश्यादलाल ही वेश्यागमनाकरीता तीचे राहते घरी वेश्याव्यवसाकरीता मुली पुरविणार असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांना मिळाल्यावरुन पोलीस पथक, बोगस गिऱ्हाईक व दोन पंच तसेच असे सदर ठिकाणी जावुन दि. १८/०८/२०२३ रोजी कारवाई करुन महीला वेश्यादलाल सिलीया लिंडा वय ३१ वर्षे हीस अटक करुन तीन युगांडा देशातील महीला पिडीतांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, बोगस गि-हाईक तयार करुन त्यास नमुद वेश्यादलाल याचेकडे मिळालेल्या माहीतीच्या आधारे सिलीया लिंडा हीचे मोबाईल क्रमांकावर संपर्क करुन वेश्यागमनासाठी मुलीची मागणी केली असता तीने सांगितले की, मी एका मुलीचे एक तासाचे ७०००/- रु. व अर्ध्या तासाचे ५०००/- रु.घेते. आपणास कबुल असेल तर सिल्वर प्लाझा बिल्डींग हनुमान नगर नालासोपारा पश्चिम येथे माझ्या राहत्या घरी येण्यास सांगितल्यावर बोगस गि-हाईक याने तीस होकार दिला. त्यानंतर बोगस गि-हाईक हा पंचासह रुम नं. ००२ सिल्वर प्लाझा, हनुमान नगर येथे गेले असता वेश्यादलाल सिलीया लिंडा हीने बोगस गिऱ्हाईकास तीन महीला दाखवल्या व त्यामधुन तुम्ही पसंद करा व माझे कमिशन व वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन मला ठरल्याप्रमाणे पैसे दया असे सांगितल्यावर बोगस गिऱ्हाईक याने पोनि. चौधरी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे एक महीला पसंद करुन छापा पंचनाम्यातील ठरल्याप्रमाणे तीस पैसे दिले असता बोगस गिऱ्हाईक याने पोलीस पथकास कन्फरमेशन इशारा दिला असता दोन पंचासह सदर ठिकाणी जावून छापा टाकला त्यामध्ये एक महीला दलाल आरोपीत नामे सिलीया लिंडा वय ३१ वर्षे हीस ताब्यात घेतले व तीन महीला पिडीत यांची वेश्याव्यवसायातुन सुटका केली आहे.

यातील वेश्यादलाल नामे सिलीया लिंडा वय ३१ वर्षे रा.रुम नं.००२ सिल्वर प्लाझा, हनुमान नगर नालासोपारा पश्चिम ता.वसई जि.पालघर मुळ देश- मलावी हीने पिडीत महीलांना पैशाचे आमिष दाखवुन वेगवेगळया ग्राहकांना बोलावुन त्यांचेकडुन पैसे घेवुन पिडीत महीला यांना वेश्याव्यवसाय करण्यास लावते व वेश्यागमनाचा मोबदला व कमीशन मिळुन असे एकुण एका महीलेचे एक तासाचे ७०००/-रु. व अर्ध्या तासाचे ५०००/- रु. घेते व त्यातील १०००/- रुपये पिडीत महीलांना देत असते.

तरी सदर पिडीत महीला यांची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका करुन नमूद महीला दलाल आरोपीत हीस अटक करुन नालासोपारा पोलीस ठाणे गु.रजि.नं. ३९३/२०२३ भादविस कलम ३७०(१)(३) सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ प्रमाणे आरोपीत सिलीया लिंडा वय ३१ वर्षे हीचेवर गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त श्री. अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. अमोल मांडवे यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि. संतोष चौधरी व पोहवा. पवार, किणी, शेटये, शिंदे, मपोहवा. डोईफोडे, तिवले, मपोशि, जगदाळे, चालक पोहवा. पागी, सर्व नेम. अनै.मा.वा.प्र. कक्ष नालासोपारा यांनी केली आहे.